गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०२०/नि.सु. श्वान अध्यापक(१६-१७)/२६०/२०१२.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ११ /०८/२०१७.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-०६१६/प्र. क्र. १९६/पोल-१ अ, दि.११/०८/२०१७ (प्रत संलग्न केली आहे).

**विषय** :- मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उप अधीक्षक (श्वान अध्यापक) या संवर्गातील पदावर पदोन्नीने पदस्थापना.

* * * * * *

"मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उपअधीक्षक (श्वान अध्यापक)" ह्या पदावर पदोन्नती देण्यासाठी सन २०१६-१७ च्या निवडसूचीमधील पात्र पोलीस निरीक्षक (श्वान पथक) या संवर्गातील **श्री. अशोक सुखाजी वाघ, पोलीस निरीक्षक, (श्वान पथक) यांना मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उपअधीक्षक (श्वान अध्यापक), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे** या पदावर पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश यासोबत कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. प्रस्तुत अधिका-याविरूध्द आता गुन्हा दाखल झाला असेल, किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा त्यांना निलंबित केले असल्यास संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नती बहाल न करता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.

आ. पदोन्नती आदेशाधिन अधिकारी नवीन पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तात्काळ या कार्यालयास कळवावी.

इ. अधिकारी जर पदोन्नतीवर तातडीने हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दि. १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व १०/०२/१९९१, तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि. १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

ई. प्रस्तुत आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांच्या प्रथम पृष्ठ, व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

उ. पदोन्नतीवर पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा अन्य न्यायालयाचे स्थगित आदेश असल्यास ते विचारात घेऊन उक्त अधिका-यास पदोन्नतीवर पदस्थापना देण्यात यावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत, सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

प्रत :-

जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३-अ, ९, ११, १४-अ, ३६ व ४०.
पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. प्रस्तुत पदोन्नती आदेश **"मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उपअधीक्षक (श्वान अध्यापक) २०१६-१७"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांकरिता प्रसिध्द करावे.

निवडसूची सन २०१६-१७.
मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उप अधीक्षक (श्वान अध्यापक) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-०६१६/प्र.क्र.१९६/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-११ ऑगस्ट, २०१७.

वाचा :-पोलीस महासंचालक यांचे पत्र क्र. पोमसं/२/१०२०/नि.सू. श्वान अध्यापक/२६०/२०१२, दि. ३.४.२०१७ व दि. ५.८.२०१७.

शासन आदेश :-

"मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उप अधीक्षक (श्वान अध्यापक)" या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१६-१७ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या "पोलीस निरीक्षक (श्वान पथक) " या संवर्गातील खालील अधिकाऱ्यास "मुख्य श्वान अध्यापक/ पोलीस उप अधीक्षक (श्वान अध्यापक)" या (वेतनश्रेणी रु. १५,६००-३९,१००+ग्रेड पे ५४००/-) पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. अशोक सुखाजी वाघ | गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | मुख्य श्वान अध्यापक / पोलीस उप अधीक्षक (श्वान अध्यापक), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे |

२. उपरोक्त अधिकाऱ्यास विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित /प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही च्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, संबंधित अधिकारी सदर शिक्षा पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र: २७९७/२००४ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७०८११११५३७१४३४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2017.08.11 15:27:25 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
**उप सचिव, गृह विभाग.**

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. पोलीस आयुक्त, पुणे,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१०. संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
११. निवडनस्ती / पोल-१(अ).